दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४८६ वा ● शनिवार, ता. ०३ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा- फडणवीस

### ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन

**सातारा । रयत समाचार**

राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा राहील. इतर कोणतीही भारतीय भाषा सक्तीची नसेल, ती ऐच्छिक स्वरूपातच राहील. इतर भाषा कोणत्या इयत्तेपासून सुरू करायच्या याबाबतचा निर्णय डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर घेतला जाईल, असे स्पष्ट प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सातारा येथील शाहू स्टेडियममध्ये आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून महाराष्ट्राचा आत्मा आहे, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठीच्या संवर्धनासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. यावेळी संमेलनाच्या उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. मृदुला गर्ग, स्वागताध्यक्ष व राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, ९८ व्या संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. ताराबाई भवाळकर, आ. अतुल भोसले, आ. मनोज घोरपडे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नगराध्यक्ष अमोल मोहिते, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, भारती विद्यापीठाचे



कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, उद्योजक व संमेलनाचे संरक्षक फरोख कूपर, जिल्हाधिकारी संतोष पाटील तसेच साहित्य महामंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विश्वास पाटील यांची 'पानिपत' कादंबरी वाचताना त्यांच्या विचारविश्वावर खोल परिणाम झाला. मराठी मातीशी प्रामाणिक राहून इतिहास, समाज आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारे साहित्य निर्माण होणे हीच मराठी साहित्याची खरी ओळख आहे. वारकरी साहित्य, संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज यांच्या योगदानाचा उल्लेख करत त्यांनी संत तुकाराम महाराजांचे विचार आणि 'शब्देचि रत्ने' ही परंपरा आजही समाजाला दिशा देत असल्याचे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोश तयार करून मराठी भाषेला प्रशासकीय दर्जा दिला, याची आठवण करून देताना मुख्यमंत्री म्हणाले की, मराठीच्या संवर्धनासाठी शासन कटिबद्ध आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून, आता मराठीच्या विकासासाठी केंद्राच्या सहकार्याने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. मात्र केवळ दर्जा मिळवणे पुरेसे नसून मराठीला व्यापक लोकमान्यता मिळवून देणे हेच खरे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जेएनयूसारख्या संस्थांमध्ये मराठी अध्यासन सुरू करण्यात आल्याचाही त्यांनी उल्लेख केला. भाषाविषयक धोरण स्पष्ट करताना मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यात मराठी भाषा सक्तीची राहील; मात्र इतर कोणत्याही भारतीय भाषेची सक्ती केली जाणार नाही. त्या भाषा ऐच्छिक असतील. यासंदर्भात अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून तिचा अहवाल अंतिम टप्प्यात आहे. साताऱ्याच्या साहित्यिक परंपरेचा गौरव करताना मुख्यमंत्री म्हणाले की, आतापर्यंत झालेल्या ९८ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांपैकी सर्वाधिक सहा संमेलनांचे आयोजन सातारा जिल्ह्यात झाले असून, तब्बल १७ संमेलनाध्यक्ष हे सातारा जिल्ह्याचे भूमिपुत्र होते. संमेलनाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा, मावळ फाउंडेशन, सातारा तसेच सहभागी सर्व संस्थांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले. या साहित्य संमेलनामुळे मराठी साहित्याला नवी दिशा व नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संमेलनाच्या उद्घाटक डॉ. मृदुला गर्ग यांनी राष्ट्रीय स्तरावरील मराठी साहित्याचा आढावा घेत कवी नामदेव ढसाळ, मलिका अमर शेख, उर्मिला पवार, शरणकुमार लिंबाळे, विजय तेंडुलकर आणि महेश एलकुंचवार यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव केला. ९९ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात साताऱ्याचा गौरवशाली इतिहास मांडत मराठी साहित्याची समृद्ध परंपरा अधोरेखित केली. ''तुमच्या खांद्यावर झेंडा कोणत्याही जाती, धर्माचा असो; पण त्याचा दांडा मराठीच असायला हवा. तुमच्या खांद्यावर पालखी कोणाचीही असो, तिचा गोंडा मराठीच असायला हवा,'' असे प्रभावी शब्दांत त्यांनी मराठीप्रेम व्यक्त केले. तसेच राज्यातील सर्व एसटी बसस्थानके व रेल्वे स्थानकांवर वृत्तपत्र विक्रेत्यांना व पुस्तक विक्रेत्यांना पुन्हा दुकाने देण्यात यावीत, तसेच जिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयांसमोर माफक दरात पुस्तक विक्रीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशा मागण्या त्यांनी मांडल्या. डॉ. ताराबाई भवाळकर यांनी आपल्या कार्यकाळातील अनुभव कथन करताना सांगितले की, मराठी भाषा अधिक व्यापक होत असून गावागावांत साहित्य चळवळ रुजत आहे. ग्रामीण भागात नवे लेखक व प्रकाशक तयार होत असून त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. प्रत्येकाला आपल्या भावना शब्दांत मांडता येत नाहीत; त्या व्यक्त करताना आपण समूहमनाचा आवाज बनलो, असे त्यांनी नमूद केले. स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रास्ताविकात शतकानंतर साताऱ्यात साहित्य संमेलन होत असल्याचा आनंद व्यक्त केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याचे त्यांनी नमूद केले. संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात संमेलनाची सविस्तर माहिती दिली, तर साहित्य महामंडळाच्या कार्यवाह सुनीताराजे पवार यांनी आभार मानले.

## ४ जानेवारीला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित ''महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा२०२५'' ही परीक्षा शनिवार, ता. ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्ह्यातील ४५ परीक्षा उपकेंद्रांवर घेण्यात येणार आहे. परीक्षा कालावधीत कोणताही गैरप्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी आयोगाचे केंद्रप्रमुख तथा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. या परीक्षेसाठी जिल्ह्यातून एकूण १४ हजार २९५ उमेदवार बसणार असून, कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये ११ उपजिल्हाधिकारी दर्जाचे समन्वय अधिकारी, २ उपजिल्हाधिकारी दर्जाचे भरारी पथक अधिकारी, ४५ उपकेंद्रप्रमुख (वर्ग-१ अधिकारी), १३४ पर्यवेक्षक, ५८४ समवेक्षक, समन्वय अधिकारी व भरारी पथकांचे १३ सहाय्यक, १३५ लिपिक, ४५ केअरटेकर, ४५ बेलमन, १७९ शिपाई, १३३ पाणी वाटप कर्मचारी तसेच ५६ वाहनचालक यांचा समावेश आहे. उमेदवारांना परीक्षा केंद्रावर सकाळी ९.३० वाजल्यापासून प्रवेश देण्यात येणार असून, आयोगाने दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. परीक्षा कक्षामध्ये मोबाईल फोन, कॅल्क्युलेटर, डिजिटल डायरी, पेजर, मायक्रोफोन यांसह कोणतीही दूरसंचार साधने आणण्यास व बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्रे आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच डाउनलोड करून घ्यावीत. दुय्यम प्रवेश प्रमाणपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात येणार नाहीत. तसेच परीक्षा उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरातील सर्व एस.टी.डी. बूथ, फॅक्स व झेरॉक्स दुकाने परीक्षा कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## पुढील महिन्यात सहा खाण पट्ट्यांचा लिलाव- मुख्यमंत्री डॉ. सावंत

### 'डंप'चा दुसरा टप्पाही लवकरच





**पणजी । रयत समाचार**

राज्यात आतापर्यंत १२ खाण पट्ट्यांचा लिलाव करण्यात आला असून त्यापैकी ५ खाण पट्ट्यांवर प्रत्यक्ष कामकाज सुरू झाले आहे, तर आणखी ४ पट्टे लवकरच कार्यान्वित होणार आहेत. उर्वरित ६ खाण पट्ट्यांचा लिलाव पुढील महिन्यात करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिली. तसेच सरकारी 'डंप पॉलिसी' अंतर्गत लिलावाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसरा टप्पा या महिन्यातच राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शुक्रवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री सावंत यांनी ही माहिती दिली. यावेळी त्यांनी राज्यातील अर्थविषयक स्थितीबाबतही माहिती दिली. अर्थ खात्याच्या बैठकीबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, यंदाच्या अर्थसंकल्पात ज्या तरतुदी करण्यात आल्या आहेत, त्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी सुमारे ५४ टक्के निधी नोव्हेंबरअखेरपर्यंत खर्च करण्यात आला आहे. मार्च २०२६ अखेरपर्यंत मंजूर निधीपैकी सुमारे ९५ टक्के निधी वापरण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बैठकीत अर्थसंकल्पीय हमींचा पुन्हा एकदा आढावा घेण्यात आला. सर्व खात्यांनी दिलेल्या हमी पूर्ण करण्याच्या सूचना खातेप्रमुखांना देण्यात आल्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले. डिसेंबर महिन्यात अपेक्षेप्रमाणे जीएसटी संकलन झाले नसल्यामुळे त्याचा काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## पंढरीच्या वारीचा अनुभव; रविवारी घ्या मुंबईमध्येच

**मुंबई । रयत समाचार**

पंढरपूरच्या वारीतील अनुभव घ्यायचा आहे, परंतु या वारीत सहभागी होता येत नाही, अशी अतृप्त इच्छा राहिलेल्या भाविकांना पंढरीच्या वारीचा अनुभव येत्या रविवारी मुंबईतच घेता येणार आहे. श्री वारकरी प्रबोधन महासमितीच्या वतीने हा सोहळा रविवारी कॉटनग्रीन राम मंदिर ते वडाळा विठ्ठल मंदिर यादरम्यान होणार आहे. या सोहळ्यात मुंबई, ठाणे, रायगड या जिल्ह्यातील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी होतात. ज्यांना पंढरीचा सोहळा अनुभवाचा आहे त्यांनी या सोहळ्यात जरूर सहभागी व्हावे, असे आवाहन श्री वारकरी प्रबोधन महासमितीच्या वतीने करण्यात आले आहे.

पंढरपूरची आषाढी वारी महाराष्ट्राचा सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि ऐतिहासिक वारसा आहे. या वारीत सहभागी होता यावं, अशी प्रत्येक मराठी माणसाची इच्छा असते, परंतु घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या मुंबई शहरातील नागरिकांना या वारीत सहभागी होण्या एवढा वेळ मिळत नाही. म्हणूनच गेल्या २६ वर्षांपासून मुंबईत श्री पांडुरंगाचा पालखी सोहळा आयोजित केला जातो. यावर्षी रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी हा सोहळा निघणार आहे. या सोहळ्यात मोठ्या प्रमाणात वारकरी सहभागी होतात. टाळ मृदंगाच्या गजरात हा सोहळा कॉटन ग्रीन येथील राम मंदिरातून निघून वडाळा येथील विठ्ठल मंदिरात त्याचा समारोप होतो. जसे पंढरपूरच्या वारीमध्ये घोड्याचे गोल रिंगण होतं, फुगड्या होतात तसा सर्व सोहळा दरवर्षी होत असतो.

वारकरी संप्रदायाच्या वैचारिक ऐश्वर्याचे दर्शन मुंबई शहरात येणाऱ्या भारतातील आणि विदेशातील पर्यटकांना व्हावं, तसेच इथे राहणाऱ्या परप्रांतीय लोकांनाही वारकरी संप्रदायाचा हा वारसा कळवा यासाठी २६ वर्षांपूर्वी हा सोहळा सुरू करण्यात आला. पंढरपूरच्या वारीमध्ये ज्याप्रमाणे दिंड्यांना क्रमांक दिले जातात त्याप्रमाणे इथेही दिलेल्या क्रमांकावरच दिंड्या चालतात.



## 'आई उदो'च्या गजरात रेणुका देवी शाकंभरी पौर्णिमा यात्रा उत्साहात

### सौंदत्ती डोंगरावर लाखो भाविकांची उपस्थिती

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

सालाबादप्रमाणे यंदाही लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सौंदत्ती येथील श्री रेणुका देवीची शाकंभरी पौर्णिमा यात्रा मोठ्या भक्तिभावात सुरू आहे. कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा, आंध्रप्रदेश तसेच केरळ राज्यातून तब्बल पाच लाखांहून अधिक भाविक देवीच्या दर्शनासाठी सौंदत्ती डोंगरावर दाखल झाले आहेत.

शनिवारी यात्रेचा मुख्य दिवस असून 'आई उदो'च्या गजरात व भंडाऱ्याच्या उधळणीने संपूर्ण डोंगर दुमदुमून गेला आहे. यात्रेनिमित्त लाखो भाविक दाखल झाल्याने देवीच्या दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या आहेत. वाढती गर्दी लक्षात घेता श्री रेणुका देवी विकास प्राधिकरणाच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी व्यापक तयारी करण्यात आली आहे. भाविकांनी शांतता व शिस्त पाळून दर्शन घ्यावे, असे आवाहन मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक दुडगुंटी यांनी केले आहे. बेळगाव जिल्हा, कोल्हापूर, सांगली, सातारा, गोवा तसेच कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा व केरळ येथील भाविक मोठ्या संख्येने शाकंभरी पौर्णिमेला सौंदत्ती डोंगरावर दाखल होत असतात. वर्षभर भाविकांची वर्दळ असली तरी जानेवारी महिन्यातील शाकंभरी पौर्णिमा यात्रेला सर्वाधिक गर्दी होत असल्याचे चित्र दिसून येते. यात्रा काळात नित्य नियमाप्रमाणे पहाटे देवीचा अभिषेक, पूजा व आरती झाल्यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात येते. पूजा काळात काही वेळ दर्शन बंद राहिल्याने रांगेत उभ्या असलेल्या भाविकांची गैरसोय होत असल्याचेही दिसून येते. शाकंभरी पौर्णिमा यात्रेसाठी प्रशासनाने व्यापक उपाययोजना केल्या आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी ४० लहान व ५ मोठ्या टाक्यांची व्यवस्था करण्यात आली असून विविध ठिकाणी नळ बसविण्यात आले आहेत. स्वच्छतेसाठी अतिरिक्त कर्मचारी नेमण्यात आले आहेत. डोंगरावरील सर्व पथदीपांची दुरुस्ती करून प्रकाशव्यवस्था करण्यात आली आहे.

मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर स्नानकुंड, डोंगरावरील तीन प्रवेश नाके तसेच संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. भाविकांना मंदिराबाहेरूनही देवीचे दर्शन घेता यावे यासाठी भव्य एलईडी स्क्रीन लावण्यात आले आहेत. यात्रा काळात वाहनांची मोठी गर्दी होत असल्याने ठरावीक ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र वाहनांची संख्या मोठी असल्याने काही वेळा वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

तसेच आरोग्य विभागाच्या वतीने वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लाखो भाविक देवी दर्शनासाठी येत असल्याने दर्शनासाठी मोठ्या रांगा लागलेल्या आहेत. शाकंभरी पौर्णिमा संपल्यानंतरही पुढील आठ दिवस यल्लमा डोंगरावर भाविकांची मोठी गर्दी राहणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यात्राकाळात भाविकांनी भक्तीभावाने, संयमाने व शिस्तीने देवीचे दर्शन घ्यावे तसेच प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक दुडगुंटी व कार्यकारी सचिव नागरत्ना यांनी केले आहे.

## ११०० रुपयांचे पूजा साहित्य आता १५१ रुपयांत

### भाविकांची लूट थांबविण्यासाठी प्रशासकांचा निर्णय

**नेवासा । विजय खंडागळे**

श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथे अनेक वर्षांपासून भाविकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत पूजेच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी येत होत्या. या पार्श्वभूमीवर देवस्थानचे प्रशासक तथा विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी स्वतः याची दखल घेत तातडीने व्यावसायिक व देवस्थान प्रशासनाची बैठक घेतली.

पूजेच्या नावाखाली होणारी लूट थांबविण्यासाठी आठ दिवसांच्या आत मंदिर परिसरात ठळक अक्षरांत दरपत्रक फलक लावण्याचे आदेश त्यांनी दिले. या आदेशानंतर शनिशिंगणापूर परिसरात पूजा साहित्याचे दर निश्चित करण्यात आले असून, पूर्वी ११०० रुपयांपर्यंत विकले जाणारे पूजा साहित्य आता अवघ्या १५१ रुपयांत उपलब्ध करून देण्यात येत आहे. हे नवे दरपत्रक प्रशासक प्रवीण गेडाम यांच्या पुढाकारातून लागू करण्यात आले आहे. देवस्थानच्या पार्किंग व्यवस्थेबाबतही स्पष्ट दर जाहीर करण्यात आले असून देवस्थानचे पार्किंग मोफत राहणार आहे.

> **नव्या दरपत्रकानुसार पूजा ताटामध्ये नारळ, रुईच्या पानांचा हार, काळे कापड, शनियंत्र, काळी बाहुली आदी साहित्यांचा समावेश असून पूजा ताट १५१ ते ७५० रुपयांपर्यंत उपलब्ध राहणार आहे. तसेच तेलाचे दर १०० रुपयांपासून साडेचार हजार रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आले.**

मात्र खासगी पार्किंगमध्ये चारचाकी वाहनांसाठी ५० रुपये तर बससाठी १०० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. मंदिर परिसरात पूजा साहित्य व पार्किंगसाठी नवे दरफलक लावण्यात आले असल्याचे दिसून येत आहे. या नव्या दरपत्रकामुळे श्रीक्षेत्र शनिशिंगणापूरकडे भाविकांचा ओढा अधिक वाढावा, यासाठी व्यावसायिक व भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक प्रवीण गेडाम यांनी केले आहे. दरम्यान, भाविकांची फसवणूक, लुटमार अथवा अडवणूक झाल्यास तक्रार करता यावी यासाठी फलकावर बारकोड स्कॅनद्वारे तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या निर्णयाचे भाविकांकडून स्वागत होत असून काही व्यावसायिकांमध्ये मात्र लुटमार थांबणार असल्याने नाराजीचे वातावरण असल्याचेही बोलले जात आहे.

देवस्थानचे प्रशासक प्रवीण गेडाम यांना स्वतः ११०० रुपयांचे पूजा साहित्याचे ताट देण्यात आल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर भाविकांची होणारी लूट थांबवण्यासाठी कठोर भूमिका घेत दरफलक लावण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली.





# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक - २०२५-२६



## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक



सक्षम नेतृत्व, ठोस कार्य आणि विश्वासार्ह कामगिरीही केवळ घोषवाक्ये नाहीत, तर माझ्या सार्वजनिक जीवनाची ओळख आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना नागरिकांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला नाही, हीच माझी खरी ताकद आहे. महानगरपालिका सभापती आणि नगरसेविका म्हणून काम करत असताना, विकासाची ठाम भूमिका घेऊन सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवणे हेच माझे प्रमुख ध्येय राहिले आहे. रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य, महिला प्रश्न, दुर्बल घटकांचे हक्कया सर्व बाबींमध्ये केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कामातून उपाययोजना करण्याचा मी नेहमी प्रयत्न केला आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग (ब) या प्रवर्गाचे प्रतिनिधित्व करताना, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याची जबाबदारी मी प्रामाणिकपणे निभावली आहे. प्रत्येक निर्णय घेताना सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवूनच काम केले. त्यामुळेच आजही नागरिकांचा विश्वास माझ्यासोबत ठामपणे उभा आहे. शिवसेना पक्षाच्या विचारांवर निष्ठा ठेवून, पक्षाच्या माध्यमातून जनतेच्या सेवेसाठी काम करण्याची संधी मला मिळाली. विकासाच्या प्रत्येक पावलावर विश्वासाचा ठसा उमटवणे, हेच माझे धोरण आहे. राजकारण माझ्यासाठी सत्तेचे साधन नसून, समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे. पुढील काळातही नागरिकांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढा देणे, विकासासाठी ठोस निर्णय घेणे आणि नगरच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत राहणेयाच निर्धाराने मी माझी भूमिका स्पष्ट करते.

**प्रभाग क्रमांक १५**
**नागरिकांचा मागास प्रवर्ग (ब)**
**सौ. सुवर्णाताई दत्ता जाधव**
**मा. नगरसेविका शिवसेना शिंदेसेनेच्या उमेदवार**




# भाजप-राष्ट्रवादी रस्सीखेच शिगेला

## भाजपचे तीन, राष्ट्रवादीचे दोन उमेदवार बिनविरोध

**तुषार सोनवणे । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीत बिनविरोध निवडींमुळे शहरातील राजकीय वातावरण तापले असून भाजप आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होत आहे. परवा राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट) चे कुमार वाकळे आणि प्रकाश भागनगरे हे दोन उमेदवार विरोधकांनी अर्ज माघारी घेतल्याने बिनविरोध विजयी झाले. त्यामुळे काल दिवसभर नगरच्या राजकारणात राष्ट्रवादीची चर्चा केंद्रस्थानी होती.

काल उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपने जोरदार मुसंडी मारली. दुपारी तीन वाजण्यापूर्वी प्रतिस्पर्धी उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने भाग ६ ड मधून करण कराळे, प्रभाग ६ ब मधून सोनाबाई शिंदे आणि प्रभाग ७ मधून पुष्पा अनिल बोरुडे हे भाजपचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले. अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी शहरात राजकीय घडामोडींना वेग आला. प्रभाग १६ ड (केडगाव) येथून संदीप बन्सी कराळे, प्रभाग १७ अ मधून अक्षता डांगे, प्रभाग १० अ मधून गौरव अरुण ढोणे यांनी अपक्ष उमेदवारी मागे घेतली. तसेच प्रभाग १३ ड मधून सुरेश नारायण खरपुडे, प्रभाग १३ ब मधून अनिता कैलास खरपुडे आणि प्रभाग १६ क मधून संग्राम कोतकर यांनीही अर्ज माघारी घेतले. ऐनवेळी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने शहरात विविध राजकीय चर्चांना उधाण आले आहे.




राजकीय समेट, शब्द देणे आणि आर्थिक व्यवहार झाल्याच्या चर्चाही रंगताना दिसत आहेत. १५ जानेवारीला मतदान, तर १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार असून त्यानंतरच अहिल्यानगर महानगरपालिकेतील नेमके राजकीय समीकरण स्पष्ट होणार आहे. सध्या तरी नगर शहरातील खरी लढत भाजप आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातच होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# ६३ जागांसाठी २८३ उमेदवार रिंगणात

## १९४ उमेदवारांनी घेतली माघार

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज माघारीची प्रक्रिया काल ता. २ जानेवारी रोजी पूर्ण झाली. अर्ज छाननीनंतर एकूण ४७७ उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी दोन दिवसांत १९४ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. माघार प्रक्रियेनंतर पाच उमेदवार बिनविरोध निवडून आले असून, उर्वरित ६३ नगरसेवक पदांसाठी आता २८३ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले आहेत.

त्यामुळे महापालिकेच्या निवडणुकीत चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या माहितीनुसार माघार प्रक्रियेदरम्यान उमेदवार, पक्ष प्रतिनिधी आणि समर्थकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. माघारीनंतर अनेक प्रभागांतील लढतींचे चित्र स्पष्ट झाले असून काही प्रभागांत थेट सामना, तर काही ठिकाणी बहुरंगी लढती रंगणार आहेत. आता प्रचाराचा वेग वाढणार असून सर्वच राजकीय पक्ष आणि अपक्ष उमेदवारांकडून मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू होणार आहेत. आगामी निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासनाकडून आवश्यक तयारी करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# महिला एकलव्यांना क्रिकेटचे मोफत प्रशिक्षण

## निऱ्हाळींच्या एकलव्याचा स्तुत्य उपक्रम

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी शहरातील प्रा. शशीकांत निऱ्हाळी हे महिला क्रिकेटपटूंना मोफत प्रशिक्षण देत त्यांच्या घराण्याचा वारसा चालवत आहेत. त्यांचे पितामह तथा पाथर्डी-शेवगाव विधानसभा मतदारसंघाचे प्रथम आमदार स्वर्गीय माधवराव निऱ्हाळी यांनी स्थापन केलेली, एकलव्य शिक्षण संस्था, त्यांनी माजी केंद्रीय मंत्री स्व. बबनराव ढाकणे यांना अर्पण करून त्यागाचा नवा आदर्श निर्माण केला होता.

स्व. माधवराव निऱ्हाळी हे महान स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांना सरकारच्या वतीने देण्यात आलेली जमीनही त्यांनी सरकारजमा करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, यासंदर्भात त्यांनी केलेला पत्रव्यवहार नाशिकला पोहचण्यापूर्वीच त्यांचे नातू प्रदीप निऱ्हाळी यांनो रोखला होता. त्यामुळे, सदर जमीन त्यांच्या वारसदारांकडे राहिले. त्यागाची अशी आदर्श परंपरा असलेल्या निऱ्हाळी परिवाराने आजवर जपली आहे. त्यांच्या आदर्शांवर मार्गक्रमण करत असलेले त्यांचे नातू प्रा. शशीकांत निऱ्हाळी हे मुलींना मोफत क्रिकेटचे प्रशिक्षण देत आहेत. त्याचाच परिपाक म्हणून



संस्कृती घोरतळे या साडेबारा वर्षांच्या मुलीची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर निवड झालेली ती पहिली मराठी (महाराष्ट्रीयन) मुलगी आहे. तीने आजवर तीन शतके ठोकली आहेत. फलंदाज व विकेट कीपर या दोन्ही प्रकारांत ती राष्ट्रीय क्रिकेट संघाचं प्रतिनिधीत्व करणार आहे. निऱ्हाळी अकादमीतील सात मुली महाराष्ट्र राज्य पातळीवर रणजी, इंडियन प्रीमियर लीग व महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेत खेळल्या आहेत.

कसल्याही सुविधा व राजकीय वरदहस्त नसताना प्रा. शशीकांत निऱ्हाळी यांनी क्रिकेट खेळाला संजीवनी दिली आहे. ॲड. प्रताप ढाकणे यांनी त्यांना मैदान उपलब्ध करून दिले. क्रिकेट खेळासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांचा अभाव असूनही त्यावर मात करत यशोशिखराला गवसणी घालणारी व मुलींना मोफत प्रशिक्षण देणारी ही जिल्ह्यातील एकमेव क्रिकेट अकादमी आहे. यासाठी सकाळी चार तास व सायंकाळी चार तास कठोर परिश्रम करत प्रा. निऱ्हाळी हे मुलामुलींना क्रिकेटचे प्रशिक्षण देतात. त्यासाठी, त्यांनी निर्माण केलेली गवताळ खेळपट्टी जिल्ह्यात अन्यत्र कुठेही नाही. त्यासाठी, तीन लाख रुपये खर्च आला असून पालकांचा उस्फुर्त प्रतिसाद व सहभागातून हे शक्य झाल्याचे ते सांगतात. बीसीसीआयच्या वतीने केरळ येथील राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याचा मान त्यांनी घडवलेल्या मुलींनी मिळवला आहे. संस्कृती घोरतळे हिच्या पाठोपाठ भक्ती गोविंद रुपनर ही देखील त्याच वाटेवर चालण्यास सज्ज झाली आहे. प्रा. शशीकांत निऱ्हाळी हे स्वतःही एक दर्जेदार खेळाडू होते. यासाठी त्यांना कुणीही गुरू लाभला नव्हता, म्हणून ते एकलव्यासारखे स्वतःच्या गुणसंपन्नतेने घडले होते. आज हाच एकलव्य अशा कितीतरी महिला एकलव्यांना घडवत आहे.

# ६०० कर्मचाऱ्यांना निवडणूक अधिकाऱ्यांच्या नोटिसा

## प्रशिक्षणाला गैरहजर व काम न स्वीकारणाऱ्यांवर कारवाई

**अहमदनगर । रयत समाचार**

महापालिका निवडणुकीसाठी आयोजित मतदान प्रक्रियेच्या प्रशिक्षण वर्गास गैरहजर राहिलेल्या सुमारे ४५० कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच निवडणूक कामासाठी नियुक्ती आदेश मिळूनही जबाबदारी स्वीकारण्यास नकार देणाऱ्या सुमारे १५० कर्मचाऱ्यांनाही नोटिसा देण्यात आल्याने एकूण जवळपास ६०० कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. महापालिकेचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांच्या स्वाक्षरीने या नोटिसा बजावण्यात आल्याची माहिती सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे यांनी दिली. महापालिका निवडणूक प्रक्रिया सुरू असून काल, शुक्रवारी उमेदवारी अर्ज माघारीचा अंतिम दिवस आहे. त्यानंतर प्रचाराला वेग आला असून मतदान यंत्रांची तपासणीही पूर्ण करण्यात आली आहे. ता. २९ डिसेंबर रोजी मतदानासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले होते. या निवडणुकीसाठी सुमारे २२०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यामध्ये प्राथमिक शिक्षकांसह विविध विभागांतील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. पहिल्या प्रशिक्षण सत्रास सुमारे १८०० कर्मचारी उपस्थित राहिले, तर उर्वरित ४५० कर्मचारी गैरहजर राहिले.

त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. गैरहजर कर्मचाऱ्यांना विभागीय चौकशी का करू नये, अशा आशयाच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रिया ही तणावपूर्ण व जबाबदारीची असल्याने काही कर्मचारी या कामासाठी अनिच्छुक असल्याचे दिसून येते. त्यामुळे सुमारे ३०० हून अधिक कर्मचाऱ्यांनी आजारपण, कौटुंबिक अडचणी, अपंगत्व आदी कारणे देत निवडणूक कामातून सूट देण्याचे अर्ज प्रशासनाकडे सादर केले होते. या सर्व अर्जदारांनाही नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. दरम्यान, नोटीस मिळालेल्या जवळपास निम्म्या कर्मचाऱ्यांनी निवडणूक कामासाठी हजर राहण्याची तयारी दर्शविली असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. ज्यांची अडचण वास्तव आहे, अशा कर्मचाऱ्यांची वैयक्तिक पडताळणी करून त्यांना आवश्यक ती सवलत दिली जात असल्याचे सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, जिल्हा माध्यमिक संघाचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे यांनी या नोटिसांबाबत आक्षेप घेतला आहे. त्यांनी सांगितले की, निवडणूक काळात शिक्षकांवर मोठा ताण येतो. केंद्रांवर वेळेवर जेवण व पाणी उपलब्ध होत नाही. मतदानाचा टक्का वाढत असताना कर्मचारी संख्या मात्र वाढवली जात नाही. त्यामुळे शिक्षकांवर अतिरिक्त भार पडतो. शैक्षणिक कामकाज सांभाळत असतानाच अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. निवडणूक प्रक्रियेत निर्माण झालेला गोंधळ शिक्षकांच्या माथी मारला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. निवडणूक काळात फक्त २० टक्के शिक्षकांची नेमणूक करावी व उर्वरित कर्मचारी इतर विभागांतून घ्यावेत, अशी मागणी त्यांनी केली असून चुकीच्या पद्धतीने देण्यात आलेल्या नोटिसा प्रशासनाने तात्काळ मागे घ्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचा सामाजिक उपक्रम

# ११ 'हॅपी मॉडेल स्कूल' प्रकल्प, ११ 'नेशन बिल्डर अवॉर्ड' व मॉर्च्युरी बॉक्स वितरण सोहळा उत्साहात

**अहमदनगर । आबीद खान**

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, अहिल्यानगर यांच्या वतीने ११ 'हॅपी मॉडेल स्कूल' प्रकल्पांचे वितरण, ११ 'नेशन बिल्डर अवॉर्ड' प्रदान समारंभ तसेच डिस्ट्रिक्ट ३१३२ कडून प्राप्त मॉर्च्युरी बॉक्स (शवपेटी) वितरणाचा कार्यक्रम बडीसाजन, अहिल्यानगर येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पुणे रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे माजी प्रांतपाल प्रमोद जेजुरीकर उपस्थित होते. यावेळी त्यांच्यासमवेत जेष्ठ सहकारी मित्र नितीन कामत यांनीही उपस्थिती लावली. हा उपक्रम प्रदीप धूत (व्हिडिओन समूह, मुंबई), राजेश बन्सल, सी. ए. अशोक पितळे, श्रीदत्त राजूशेठ चोपडा तसेच संतोष चंगेडिया (चेअरमन, थर्मो टेक इंजिनिअरिंग अँड सर्व्हिसेस प्रा. लि., चिंचवड, पुणे) यांच्या देणगीतून यशस्वीरीत्या साकार झाला. या प्रकल्पाबद्दल रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे अध्यक्ष सुनील कटारिया व संपूर्ण क्लबने समाधान व अभिमान व्यक्त केला. यावेळी मार्गदर्शन करताना माजी प्रांतपाल प्रमोद जेजुरीकर यांनी भविष्यात पुणे रोटरी व अहमदनगर रोटरी सेंट्रल यांच्यातील संबंध अधिक दृढ करून समाजोपयोगी संयुक्त उपक्रम राबविण्याचे आश्वासन दिले. क्लबच्या उप-प्रांतपाल मधुरा झावरे यांनी क्लबमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. अध्यक्ष सुनील कटारिया यांनी मनोगतात सांगितले की, मागील पंधरा दिवसांत होस्ट क्लब म्हणून डिस्ट्रिक्ट टीआरएफ (दि रोटरी फाउंडेशन) सेमिनार अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. त्यानंतर अवघ्या १५ दिवसांत नगर जिल्ह्यातील ११ गरजू शाळांसाठी १०० लिटर क्षमतेची पाणी शुद्धीकरण यंत्रणा, लायब्ररी कपाटे व पुस्तके वितरण, तसेच ११ आदर्श शिक्षकांना 'नेशन बिल्डर अवॉर्ड' प्रदान आणि मॉर्च्युरी बॉक्स (शवपेटी) वितरण असे तीन महत्त्वाचे उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. डिस्ट्रिक्ट ३१३२ कडून क्लबला प्राप्त झालेला मॉर्च्युरी बॉक्स श्रीगोंदा येथील एका सामाजिक संस्थेला प्रदान करून सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयुक्त कार्य करण्यात आले, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास माजी प्रांतपाल शिरीष रायते, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे चार्टर मेंबर व माजी अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण जोशी, दादा करंजुळे, डिस्ट्रिक्ट डायरेक्टर हरीश नय्यर, शहरातील विविध रोटरी क्लबचे अध्यक्ष व सचिव, डिस्ट्रिक्ट डायरेक्टर्स, क्लब प्रोजेक्ट चेअर राजेश परदेशी, मनीष बोरा, तसेच राजीव गुजर, विजू जुंदरे, गणेश शाह, अजय गांधी, नरेंद्र चोरडिया, विनोद बोरा, सतीश कटारिया, सुनील मुथा, संजय मुनोत, चेतन अमरापूरकर, हितेश गुप्ता, सुजाता कटारिया, इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा मधुबाला चोरडिया, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या अॅन्स, अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध शाळांचे प्रतिनिधी, सन्मानित शिक्षक व अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश परदेशी व हरीश नय्यर यांनी केले, तर आभार प्रदर्शन क्लबचे सचिव अमर गुरप यांनी मानले.



**'नेशन बिल्डर अवॉर्ड'चे मानकरी पुढीलप्रमाणे :**

**नारायण मंगलाराम (राष्ट्रपती पुरस्कार विजेते), जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डोंगरगण; स्मिता अशोक खिलारे, सरस्वती प्राथमिक विद्यालय, केडगाव; कांचन मिरपगारे, सखाराम मेहेत्रे विद्यालय, सावेडी; मंगेश खिलारी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाकळी ढोकेश्वर; डॉ. एकनाथ मोटे, दुर्गादेवी अमरचंद नय्यर विद्या मंदिर, मोडक, अहिल्यानगर; यास्मिन सय्यद, न्यू इंग्लिश स्कूल स्नेहालय, अहिल्यानगर; हरीशचंद्र दळवी, एस. एस. एम. अॅग्री प्रशाला, मांडवगण; अस्मिता सुळे, बालकमंदिर, अहिल्यानगर; रेणुका संजय खरदास, मार्कंडेय विद्यालय, अहिल्यानगर; बाबा पवार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दैठणे गुंजाळ; योगेश सूर्यवंशी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बुऱ्हानगर; तसेच मीना जगताप, श्रीमान अमरचंद नय्यर सेकंडरी हायस्कूल, अहिल्यानगर.**



# विद्यार्थ्यांनी उद्योगाकडे वळावे- सचिन रोही

शिंदे महाविद्यालयात नवउद्योजकता विकास व समुपदेशन कार्यक्रम

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

स्थानिक युवकांमध्ये स्वयंरोजगाराची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात नवउद्योजकता विकास व समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. या उपक्रमाला विद्यार्थी, बेरोजगार युवक-युवती तसेच नवउद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून सचिन पोपट रोही यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक कौशल्ये, व्यवसाय नियोजन, भांडवल उभारणी, शासकीय योजना, कर्ज सुविधा तसेच बाजारपेठेतील संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विशेषतः स्टार्टअप संकल्पना, डिजिटल मार्केटिंग, स्थानिक उद्योगांना चालना देण्याचे मार्ग तसेच नवकल्पनांचे महत्त्व यावर त्यांनी भर दिला. समुपदेशन सत्रादरम्यान सहभागी विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या शंका व अडचणींचे निरसन करण्यात आले. अनेक युवकांनी स्वतःचा उद्योग सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली. यावेळी काही यशस्वी उद्योजकांनी आपले अनुभव कथन करत अपयशातून शिकण्याचा व सातत्य ठेवण्याचा सल्ला दिला. आयोजकांनी सांगितले की, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे युवकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन रोजगारनिर्मितीला चालना मिळते. भविष्यातही अशा प्रशिक्षण व मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमामुळे स्थानिक पातळीवर नवउद्योजक घडण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी डॉ. हरिभाऊ वाघीरे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश साळवे होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. राहुल गायकवाड, प्रा. अनिल ढवळे, प्रा. ठवाळ, प्रा. फटे, तसेच राऊत बाळासाहेब यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. राजाराम कानडे यांनी आभार मानले.

# अंजू शेंडे यांची उच्च न्यायालयाच्या 'ओएसडी'पदी निवड

**पाथर्डी । नितीन गटाणी**

अहिल्यानगर जिल्ह्याच्या प्रमुख व जिल्हा सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांची सध्या असलेल्या पदासोबतच मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या विशेष कर्तव्य अधिकारी (ओएसडी) पदावर निवड झाल्याबद्दल शांकभरी नवरात्र महोत्सवानिमित्त त्यांच्या हस्ते श्री मोहटादेवीची महापूजा व कुंकुम अर्चन करण्यात आले.



या निवडीबद्दल देवस्थानच्या वतीने विश्वस्त बाबासाहेब दहिफळे, अॅड. विक्रम वाडेकर, अॅड. प्रसन्न दराडे, अशोक दहिफळे, श्रीकांत लाहोटी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांनी देवस्थानच्या विविध विकासकामांबाबत मार्गदर्शन केले. देवस्थान समितीकडून विकासकामांसोबतच भाविकांसाठी दैनंदिन सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात असून त्यामुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. धार्मिक व निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक म्हणून हे क्षेत्र आता राज्यभर ओळखले जाऊ लागले आहे. श्री मोहटादेवी गडावर सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करताना जिल्हा सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, लेखापाल संदीप घुले, कर्मचारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोमवारी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

डॉ. प्रकाश चिटगोपेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त उपक्रम

**अहमदनगर । समीर मन्यार**



नेत्रतज्ज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर यांचे वडील स्व. डॉ. प्रकाश चिटगोपेकर यांच्या ७० व्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त सोमवार, ता. ५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत नगरमनमाड रोडवरील प्रकाश नेत्रालय येथे अत्याधुनिक मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये लेसिक शस्त्रक्रियेद्वारे १२ नंबरपर्यंत चष्मा काढण्यासाठी १० टक्के सवलत, १२ पेक्षा अधिक नंबर असणाऱ्यांसाठी उपचारावर १० टक्के सवलत, केराटोकोनस उपचारावर १० टक्के सवलत तसेच अत्याधुनिक लेझर मोतीबिंदू शस्त्रक्रिया व काचबिंदू निवारण शस्त्रक्रियेवर २० टक्के सवलत देण्यात येणार असल्याची माहिती नेत्रतज्ज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी दिली. दरवर्षीप्रमाणे यंदाही वडिलांच्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत तळागाळातील सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांनी आपल्या डोळ्यांची योग्य तपासणी करून आरोग्याची काळजी घेण्यासाठी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी प्रकाश नेत्रालय, नगरमनमाड रोड, डौले हॉस्पिटल शेजारी येथे संपर्क साधावा किंवा मोबाईल क्रमांक ९४२०४६१११७ वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी राहुरी यांचे कार्यालय, ता. राहुरी, जि. अहमदनगर
Email id tahasilrahuri11@gmail.com दुरध्वनी क्र. (०२४२६) २३२६६०

क्र./ दंडव्य/जन्म/एसआरनं./११६/२०२४
राहुरी दि. ३१/१२/२०२५

**जाहिर नोटीस**

**राहुरी येथील मा. तहसिलदार यांचे न्यायालयात....**
श्री. नवनाथ गोपीनाथ जाधव, जि. अहिल्यानगर **अर्जदार**
रा. देहरे, ता. अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर
**विरुध्द**
ग्रामपंचायत अधिकारी **सामनेवाले**
चांदेगाव, ता. राहुरी जि. अहिल्यानगर

श्री. नवनाथ गोपीनाथ जाधव रा. देहेरे, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर यांनी दि.२७/०६/२०२४ रोजी या कार्यालयात अर्ज देऊन सिध्दार्थ नवनाथ जाधव यांचा जन्म दि. २३/०५/२०१८ रोजी चांदेगांव, ता. राहुरी येथे झाला असून जन्माची नोंदणी होऊन दाखला मिळावा म्हणून विनंती केली आहे. प्रस्तूत अर्जाची पोलीस निरीक्षक राहुरी, ग्राम महसूल अधिकारी चांदेगांव व ग्रामपंचायत अधिकारी चांदेगांव यांचेमार्फत सविस्तर चौकशी केली असून त्यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी, चांदेगांव, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर यांनी सिध्दार्थ नवनाथ जाधव यांचा जन्म दि.२३/०५/२०१८ रोजी चांदेगांव, ता. राहुरी येथे झालेला आहे. परंतू, चांदेगांव गावचे सन २०१८ सालचे जन्म नोंदणी रजिस्टर पाहिले असता सदर रजिष्टरमध्ये जन्माची नोंद आढळून येत नाही. असा दि. १२/०६/२०२४ रोजी दाखला दिला आहे. तसेच अर्जदार श्री. नवनाथ गोपीनाथ जाधव यांनी दि.२३/०६/२०२५ रोजी प्रतिज्ञापत्र नोंदवून दिले आहे.

तरी सिध्दार्थ नवनाथ जाधव यांचे जन्माची नोंद होणेबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत तहसिल कार्यालय राहुरी येथे कागदोपत्री पुराव्यासह सदरची हरकत दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माच्या नोंदीबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून तसा आदेश पारीत करणेत येईल. तद्नंतर कोणाचीही कोणतीही हरकत अथवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी,

सदरची जाहिर नोटीस आज दि. ३१/१२/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**(डॉ. अमित पवार)**
तहसिलदार राहुरी

**पेस्ट कंट्रोल**
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
**या सारख्या किटकांपासुन मुक्तता.**
**औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.**
**शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.**
**अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल**
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

# संजीवनीच्या विद्यार्थ्यांची तैवान येथे इंटर्नशिपसाठी निवड



**ही इंटर्नशिप पूर्णतः तैवान सरकारच्या प्रायोजनातून राबविण्यात येणार असून विद्यार्थ्यांचा विमान प्रवास, निवास व भोजनाचा संपूर्ण खर्च तैवान सरकारकडून केला जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना दैनंदिन खर्चासाठी दरमहा १५ हजार न्यू तैवान डॉलर मानधनही दिले जाणार आहे.**

**कोपरगाव । किसन पवार**

संजीवनी युनिव्हर्सिटी, संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेज व संजीवनी फार्मसी महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या तृतीय वर्षातील एकूण सहा विद्यार्थ्यांची तैवानमधील नामांकित नॅशनल चँग चुंग युनिव्हर्सिटी व आय-शौ युनिव्हर्सिटी येथे तीन ते सहा महिन्यांच्या कालावधीसाठी इंटर्नशिप (अंतर्वासिता) साठी निवड झाली आहे. ही निवड संजीवनी इंटरनॅशनल रिलेशन्स डिपार्टमेंटच्या पुढाकारातून संजीवनी संस्था व तैवानमधील नामांकित विद्यापीठांदरम्यान झालेल्या सामंजस्य करारामुळे (एमओयू) शक्य झाल्याची माहिती संजीवनी युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष अमित कोल्हे यांनी दिली. निवड झालेले विद्यार्थी लवकरच तैवानला रवाना होणार असून तेथील तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विविध संशोधन प्रकल्पांवर अभ्यास करून त्यावर निष्कर्ष सादर करणार आहेत. या निवडीत संजीवनी युनिव्हर्सिटीचे ईश्वरी कृष्णराव पवार, संकेत ज्ञानदेव जुंदारे, श्रीकांत लक्ष्मण पवार, संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्रतिक्षा राजेंद्र सोनवणे, सायली विनोद देशमुख तसेच संजीवनी फार्मसी महाविद्यालयातील प्रसाद बाळासाहेब चांदे यांचा समावेश आहे. संजीवनी इंटरनॅशनल रिलेशन्स डिपार्टमेंटच्या या यशस्वी उपक्रमाबद्दल संजीवनीचे अध्यक्ष नितीन कोल्हे यांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच अध्यक्ष अमित कोल्हे यांच्या हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. ए. जी. ठाकूर, संचालक डॉ. एम. व्ही. नागरहळ्ळी, इंटरनॅशनल रिलेशन्स डिपार्टमेंटचे डीन डॉ. महेंद्र गवळी, डीन डॉ. कविथा राणी, डॉ. एस. बी. दहिकर, डॉ. विनोद मालकर, डॉ. सरिता पवार, डॉ. माधुरी जावळे, प्रा. एन. वाय. सिध्दीकी आदी मान्यवर उपस्थित होते.

# नीलिमा जाधव-बंडेलू यांना 'वारसा सावित्रीचा' पुरस्कार जाहीर

**अहमदनगर । रयत समाचार**

मानवाधिकार अभियान आणि उर्जिता सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शनिवार, ता. ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता 'अभिवादन सोहळा व वारसा सावित्रीचा पुरस्कार वितरण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक क्षेत्रात सातत्यपूर्ण व उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना दरवर्षी प्रदान करण्यात येणारा 'वारसा सावित्रीचा' पुरस्कार यंदा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा जाधव-बंडेलू यांना जाहीर करण्यात आला आहे. सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता व मानवी हक्कांच्या क्षेत्रात दीर्घकाळ कार्य करत त्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा कृतीत उतरवला आहे, अशी माहिती आयोजक अॅड. संतोष गायकवाड, संध्या मेढे, प्रा. सॅम्युएल वाघमारे व भैरवनाथ वाकळे यांनी दिली. या कार्यक्रमास जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायमूर्ती योगेश पैठणकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजया जाधव, अध्यक्षा, मराठी मिशन असतील. नीलिमा जाधव-बंडेलू या गेल्या चार दशकांहून अधिक काळ दलित, महिला, बालके, कामगार-कष्टकरी व वंचित घटकांच्या प्रश्नांवर सातत्याने लेखन, अभ्यास व प्रत्यक्ष सामाजिक कार्य करत आहेत. सामाजिक न्यायाची ठाम मांडणी, वैचारिक स्पष्टता व कृतीशील सहभाग ही त्यांच्या कार्याची ओळख आहे. पत्रकारिता, समाजकार्य व कायदा या तिन्ही क्षेत्रातील अनुभवाच्या बळावर त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांवर प्रभावी भूमिका मांडली आहे. त्यांनी दैनिक 'श्रमिक विचार' (पुणे) येथे उपसंपादक, महिला व बालकल्याण विभाग, नाशिक येथे सेवाकार्य, तसेच अहमदनगर महानगरपालिका येथे प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. त्या बालकल्याण समिती, अहमदनगरच्या सदस्य राहिल्या असून पदव्युत्तर मास कम्युनिकेशन अभ्यासक्रमाच्या समन्वयक म्हणूनही कार्य केले आहे. त्यांना दिवाळी अंकातील उत्कृष्ट लेख पुरस्कार, म.सा.प., पुणे यांचा 'अनंत काणेकर पुरस्कार', 'रमाई पुरस्कार' (संभाजीनगर) आदी सन्मान लाभले आहेत. 'संदर्भ' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून विविध दैनिके-साप्ताहिके-मासिकांमधून त्यांचे लेखन नियमित प्रसिद्ध होते. दैनिक महाराष्ट्र टाइम्सच्या सर्व आवृत्त्यांमध्ये 'ओळख इंग्रजी पुस्तकांची' या सदरात त्या इंग्रजी पुस्तक परीक्षण लेखन करतात. हा सन्मान सोहळा सावित्रीबाई फुले यांचे प्रारंभीचे प्रशिक्षण ज्या ऐतिहासिक ठिकाणी झाले त्या मराठी मिशनच्या क्लेरा ब्रूस हायस्कूलच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे जयंती. त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा ज्योतीराव फुले यांच्याशी झाला. ज्योतीराव तेव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा ज्योतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. ज्योतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी ज्योतीराव याना शिकण्यास प्रेरित केले. ज्योतीरावही शिकले नंतर त्यांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व ज्योतीराव यांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, ज्योतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फ ुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!


**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

# वरिष्ठ पोस्टमास्तरपदी अमृत कुमटकर; पोस्टल संघटनेकडून स्वागत

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर प्रधान डाकघराच्या वरिष्ठ पोस्टमास्तरपदी अमृत कुमटकर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी प्रभारी पोस्टमास्तर यांच्याकडून अधिकृतपणे पदभार स्वीकारला आहे. मागील काही दिवसांपासून हे पद रिक्त होते. यापूर्वी ते सहायक अधीक्षक डाकघर, कराड येथे कार्यरत होते. अमृत कुमटकर यांनी सन २००७ मध्ये सातारा विभागातून ''डाक सहाय्यक'' म्हणून आपल्या सेवेला प्रारंभ केला. त्यानंतर त्यांनी आर्मी पोस्टल सर्व्हिसमध्ये वॉरंट ऑफिसर म्हणून देशातील विविध आर्मी पोस्ट ऑफिसमध्ये तब्बल सात वर्षे सेवा बजावली. सन २०१४ मध्ये खातेअंतर्गत परीक्षा उत्तीर्ण होऊन उपविभागीय डाक निरीक्षक म्हणून अहिल्यानगर विभागातील कर्जत येथून प्रशासकीय सेवेला सुरुवात केली. यानंतर त्यांनी बारामती विभागात इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (IPPB) मध्ये मॅनेजर तसेच सहायक अधीक्षक डाकघर म्हणून सुमारे सात वर्षे काम पाहिले. मे २०२५ मध्ये त्यांनी सहायक अधीक्षक डाकघर, मुख्यालय कराड या पदाचा कार्यभार स्वीकारला होता. या कालावधीत त्यांनी या अधिकारी पदाच्या खातेअंतर्गत परीक्षेत यश संपादन केले. विविध प्रशासकीय पदांवर काम करताना लोकाभिमुख उपक्रम राबविणारे, कामगारप्रिय अधिकारी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

**अहिल्यानगर जिल्ह्यातील रहिवासी असल्याने तसेच यापूर्वी या विभागात कार्यरत राहिल्यामुळे विभागाची सखोल माहिती आहे. वरिष्ठ पोस्टमास्तरपदी नियुक्ती झाल्याचा आनंद आहे. मिळालेली संधी ही अनमोल मानून डाक विभागाच्या योजना अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी निश्चितच प्रयत्नशील राहीन.**

**अमृत कुमटकर,**
नूतन वरिष्ठ पोस्टमास्तर,
अहिल्यानगर



मूळचे चोभेवाडी (ता. जामखेड) येथील रहिवासी असल्याने तसेच यापूर्वी अहिल्यानगर विभागात कार्यरत राहिल्यामुळे विभागाची सखोल माहिती असल्याचे त्यांनी नमूद केले. आगामी काळात सर्वांना सोबत घेऊन डाक विभागाच्या योजना अधिकाधिक ग्राहकाभिमुख करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. पदभार स्वीकारल्यानिमित्त पोस्टल संघटनेचे महाराष्ट्र व गोवा राज्य कार्याध्यक्ष संतोष यादव यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी नितीन थोरवे, मोनाली हिंगे, सुप्रिया कंधारकर, सुनील थोरात, प्रदीप सूर्यवंशी, पिरमोहम्मद चौगुले, अरुण रोकडे, आसिफ शेख, तान्हाजी सूर्यवंशी, संतोष घुले, सागर पंचारिया, शैलेश धोकटे आदींसह मोठ्या संख्येने डाक कर्मचारी उपस्थित होते.

# विखे महाविद्यालयाच्या प्रा. माधवी नेरकर यांना पीएचडी


**अहमदनगर । रयत समाचार**



विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातील प्रा. माधवी हरिष नेरकर यांना युनिव्हर्सिटी ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, जयपूर येथून विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी Design and Optimization of Battery Thermal Management System for Electric Vehicles to Enhance Performance and Efficiency" या विषयावर संशोधन केले आहे.

सदर संशोधन कार्यासाठी त्यांना युनिव्हर्सिटी ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, जयपूर येथील विद्युत अभियांत्रिकी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. गोविंदराय गोयल तसेच ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्सचे टेक्निकल कमिटी मेंबर डॉ. अनिरुद्ध मुखर्जी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रबंधासाठी बाह्य परीक्षक म्हणून एनआयटी कुरुक्षेत्र येथील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. शेली वाधेरा यांनी काम पाहिले. संशोधनाच्या दरम्यान प्रा. माधवी नेरकर यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्कोपस सूचीतील जर्नल्समध्ये दोन शोधनिबंध सादर केले असून, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांच्या विषयावर आधारित एकूण तीन संशोधन पेपर्स प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल संस्थेचे फाउंडेशन संचालक सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. तसेच संस्थेचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील आणि सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड यांनीही प्रा. नेरकर यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# सायलेंट डिव्होर्स



सायलेंट डिव्होर्स म्हणजे कायदेशीर घटस्फोट नव्हे, घर सोडणे नव्हे किंवा नात्याला अधिकृत पूर्णविराम देणेही नव्हे. सायलेंट डिव्होर्स म्हणजे एकाच घरात राहून, एकाच छताखाली जगूनसुद्धा मनाने हळूहळू एकमेकांपासून दूर निघून जाणे. बाहेरून पाहिले तर संसार सुरळीत चाललेला दिसतो; मात्र आतून नात्याचा गाभा रिकामा होत जातो. संवाद केवळ गरजेपुरता मर्यादित राहतो, भावना व्यक्त होणे थांबते आणि समजून घेण्याची इच्छाही हळूहळू संपुष्टात येते. हे वेगळेपण शांत असते आणि म्हणूनच ते अधिक धोकादायक ठरते. कारण येथे ओरड नाही, तक्रार नाही, वाद नाहीआणि त्यामुळे कुणालाही वेदना दिसत नाहीत. नातं तुटत असताना आवाज होत नाही; मात्र आतून व्यक्ती मोडत असते. हा तुटलेपणा शब्दांत मांडता येत नसल्याने तो अधिक खोलवर जखम करून जातो. सायलेंट डिव्होर्स हा असा भावनिक दुरावा आहे, जो हळूहळू माणसाच्या आत्मविश्वासावर, अस्तित्वावर आणि आत्मसन्मानावर घाला घालतो. आज असंख्य स्त्रिया अशा सायलेंट दिवसांमधून जगत आहेत. त्यांच्या आयुष्यात मुले आहेत, जबाबदाऱ्या आहेत, संसार आहे; पण त्यांच्या मनातील वेदनांकडे पाहायला कुणालाच वेळ नाही. त्या ओरडत नाहीत, तक्रार करत नाहीत, कारण त्या समजावून-समजावून थकलेल्या असतात. नवऱ्याचे अविचारी शब्द, सततचे दुर्लक्ष, भावनिक अनुपस्थिती आणि न समजून घेणारी वागणूक त्या शांतपणे सहन करत राहतात. ही शांतता कमजोरीचे नव्हे, तर थकव्याचे प्रतीक असते. समाजाने शिकवलेली 'जुळवून घे' ही शिकवण त्यांच्या मनावर इतकी ठसलेली असते की स्वतःच्या वेदनांना आवाज देणेही त्यांना चुकीचे वाटू लागते. घर टिकवण्यासाठी, नातं वाचवण्यासाठी आणि संसार चालवण्यासाठी त्या स्वतःला मागे सारतात; मात्र या सततच्या दुर्लक्षामुळे त्यांचे अस्तित्व हळूहळू धूसर होत जाते.

ती स्त्री नातं तोडत नाही, घर सोडत नाही, कारण तिला तिच्या लेकरांचे भविष्य उद्ध्वस्त करायचे नसते. आई म्हणून ती मजबूत राहते, मुलांसमोर हसते, त्यांची काळजी घेते आणि घर चालवत राहते. मात्र बायको म्हणून ती दररोज थोडी-थोडी तुटत असते. तिच्या मौनाचा अर्थ 'सगळं ठीक आहे' असा लावला जातो; प्रत्यक्षात मात्र ते मौन तिच्या वेदनांचा शेवटचा टप्पा असतो. मुलांसाठी ती स्वतःला सावरते; पण मनाच्या कोपऱ्यात साचलेली रिकामेपणाची भावना तिला आतून पोखरत राहते. मुलांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी ती स्वतःच्या भावनांवर पडदा टाकते; परंतु हेच मौन मुलांच्या मनावर नकळत परिणाम करत असते. संवादविरहित घरात वाढणारी मुलेही भावनिकदृष्ट्या गोंधळलेली होतात. सायलेंट डिव्होर्समध्ये केवळ स्त्रीच नव्हे, तर पुरुषही अनेकदा भावनिकदृष्ट्या अडकलेला असतो. भावना व्यक्त करणे म्हणजे दुबळेपणा, अशी धारणा असलेली सामाजिक रचना त्याला गप्प राहायला शिकवते. जबाबदाऱ्यांचा ताण, अपेक्षांचे ओझे आणि संवादकौशल्याचा अभाव यामुळे तोही हळूहळू भावनिकदृष्ट्या दूर जातो. मात्र त्याचे मौन समाजाला स्वाभाविक वाटते, तर स्त्रीचे मौन समजूतदारपणा म्हणून स्वीकारले जाते. याच ठिकाणी संवादाचा दुरावा अधिक खोलवर जातो. नात्यांमध्ये मोकळेपणाने बोलण्याऐवजी गृहीतकांवर संसार चालवला जातो आणि हाच सायलेंट डिव्होर्सचा पाया ठरतो. सायलेंट डिव्होर्सचा सर्वांत गंभीर परिणाम मानसिक आरोग्यावर होतो. सतत दुर्लक्षित राहणे, न समजून घेतले जाणे आणि भावनिक आधाराचा अभाव यामुळे स्त्री नैराश्य, चिंता आणि आत्ममूल्य गमावण्याच्या टप्प्यावर पोहोचते. ती हसते, काम करते, जबाबदाऱ्या निभावते; पण आतून ती एकाकी असते. समाजाला हे दुःख दिसत नाही, कारण जखमा आवाज करत नाहीत. मोठे वाद नसतात; तरीसुद्धा दररोज नात्याचा अंत होत असतो. ही वेदना अधिक तीव्र असते, कारण येथे कुणालाच थेट दोष देता येत नाही. सायलेंट डिव्होर्स टाळण्यासाठी संवाद ही एकमेव गुरुकिल्ली आहे.

बोलणे म्हणजे भांडण नव्हे, तर समजून घेण्याची प्रक्रिया आहे, हे नात्यांनी स्वीकारणे गरजेचे आहे. भावना दडपण्याऐवजी व्यक्त करणे, एकमेकांना ऐकून घेणे आणि गरज भासल्यास समुपदेशनाचा आधार घेणे नात्याला नवसंजीवनी देऊ शकते. समाजानेही स्त्रीच्या मौनाला सहनशीलता समजण्याची चूक थांबवली पाहिजे. सायलेंट डिव्होर्स हा आवाज न करता होणारा वेगळेपणा आहे, जो रोज एका स्त्रीलाआणि अनेकदा एका पुरुषालाहीआतून तोडत असतो. हे नात्याचे अपयश नसून संवादाच्या अपयशाचे द्योतक आहे. वेळेत ओळखले, समजून घेतले आणि संवादाने भरून काढले, तर हे मौन पुन्हा शब्दांत बदलू शकते. नात्यांना वाचवण्यासाठी केवळ घर टिकवणे नव्हे, तर मन जोडणे गरजेचे आहे.


**गुरुदत्त वाकदेकर**
९९८७७४६७७६,मुंबई

# सावित्रीबाईंचे विचार, वर्तमान आणि आपण

३ जानेवारी १८३१ पासून १० मार्च १८९७ हे त्यांचे आयुष्यमान देशासाठी आधुनिक जगण्याचा, बनण्याचा महामंत्र देणारे ठरले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सातारा जिल्ह्यातील नायगावच्यासावित्रीखंडोजी नेवसे पाटील पुण्याच्यासावित्रीबाई ज्योतिराव फुले झाल्या. साऱ्या जगाला वंद्य ठरलेल्या महात्मा ज्योतिरावांच्या कार्याला तेवढीच सक्रिय साथ-संगत त्यांनी कार्यकर्तृत्व घडवले ही साथसंगत केवळ मम म्हणणारी आणि उखाण्यात सांगणारी कधीच नव्हती. स्त्रियांना कोणतेच स्वातंत्र्य नव्हते. त्याकाळात स्त्रियांसाठी परिवर्तनाचे प्रशस्त मार्ग त्यांनी निर्माण केले. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक स्वातंत्र्यासाठी नवा आचार-विचार, नवे कार्य आरंभिले आणि पूर्णत्वास नेले. आपल्या आयुष्यातील ५० वर्षे त्यांनी सामाजिक युद्धात घालवली. या युद्धात झालेले आघात, छळ त्यांनी सहन केला. प्रसंगी शेणाचे गोळे ही त्यांनी झेलले. मात्र आपला मार्ग त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवला आणि त्यात यशही मिळवले.

साऱ्या कर्मठ समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर शिक्षण घेतले आणि शिक्षक, मुख्याध्यापक बनून दिले दिले. केवळ ४ वर्षांत १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या. विविध वर्गांसाठी अभ्यासक्रम तयार केले, असंख्य मुलींना प्रेरणा देऊन ज्ञानक्षेत्रात आणले. शिक्षण नव्हे, ज्ञान दिले आणि त्यांच्यात ज्ञानरुपी परिवर्तन घडविले. आधुनिक भारताच्या शिक्षणाचे नायकत्वसावित्रीबाई फुले यांच्याकडे जाते. वस्ताद लहुजी साळवे, रानबा महार, धुराजी आप्पाजी चांभार, गणू शिवा महार, फातिमा शेख, उस्मान शेख हे त्यांचे शाळेतील सहकारी होत. ज्योतिराव वसावित्रीबाई फ ुले यांनी आपल्या शाळेत शिकवलेल्या धुराजी आप्पाजी चांभार व रानबा महार या दलितांना भारताच्या इतिहासात शिक्षक होण्याचा मान मिळाला. सावित्रीबाईला स्त्रियांचे जगणे माणसात रूपांतरित करायचे होते. जातिव्यवस्था संपवायची होती. विविध मार्गांनी होणारे स्त्रियांचे शोषण बंद करायचे होते. आजचे युग हे विज्ञान-तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाचे युग आहे. सावित्रीने शिक्षणाची चळवळ ही तत्कालीन चुकीच्या रूढी-परंपरा, अंधश्रद्धा येणाऱ्या काळामध्ये बेचिराख व्हाव्यात म्हणून सुरू केली होती पण आजही कित्येक मुली-स्त्रिया धर्म, पोथी, पुराण, व्रत-उपवास, नवस अशा अंधप्रवृत्तींच्या संवर्धक म्हणून समाजात वावरताना दिसतात. पायात चपला न घालता देवाच्या दर्शनाला उपाशी-तापाशी जातात. परीक्षांमध्ये पास व्हावे म्हणून देवाला नवस बोलणं, कुणी सांगितलं म्हणून साड्या-बांगड्या वाटणं, यासाठीसावित्रीने शिक्षणाची पणती हाती दिली नव्हती तर अशा कुप्रवृत्तींना जाळण्यासाठी दिली होती. वडाला फेऱ्या मारण्यापेक्षा शिक्षणाच्या ज्ञान मंदिरात फेरे मारा नक्कीच त्याचा तुमच्या पिढीसाठी फायदा होईल. या जगात अशाप्रकारे स्त्री-शक्तीचा प्रयोग एक भोंदूगिरीच्या अंधभक्तीसाठी वापरली तरसावित्रीने शिक्षण देण्यास कुठे अर्थ उरतो. सावित्रीने सर्व जाती-धर्मातील मुलींना शिक्षण दिले परंतु आजही अब्राह्मण बाईने स्वयंपाक केला तर त्याबद्दल वाद उभारला जातो नव्हे तर त्या बाईला चक्क कामावरून निलंबित करण्यात येते. खरंच आज आपणसावित्रीचे विचार अंगिकारतोय का...? खरंच आज विचार करण्याची गरज आहे. ज्यासावित्रीने आपल्यासाठी दगड-धोंडे खाल्लेत त्याचे आपण असे पांग फेडतोय का ? आधुनिक भारतात जाती संपल्या पाहिजेत म्हणून आंतरजातीय विवाह लावण्यात त्यांनी पुढाकार घेतला परंतु आज आंतरजातीय विवाह केला तर आनंदाचे पाट वाहण्याऐवजी रक्ताचे पाट वाहतात. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेत आणि ज्योतिरावांच्या नंतर हा समाज चालविण्यात महत्वाचे योगदान दिले. सावित्रीने अडाणी महिलावर्गाला शिक्षणाचा दिवा दिला. आजही भारताच्या प्रशासकीय सेवेत अनेक महिला दाखल होत आहेत. सरपंच ते राष्ट्रपती पदापर्यंत आज महिलांनी मजल मारलेली आहे. शिक्षण, राजकारण, समाजक्षेत्र, खेळ आदी सर्व क्षेत्रांत आज महिला आघाडीवर आहेत, याचे कारण फक्त आणि फक्तसावित्रीबाईच आहेत. त्याकाळीसावित्रीने शिक्षणाची दारे महिलांना खुली केली नसती तर आज महिलांना विमानाची दारे उघडी झाली नसती. फक्त चूल आणि मूल यातच महिला अडकून पडली असती. सावित्रीबाईंनी १८७५-१८७७ या काळात दुष्काळात दुष्काळग्रस्तांना मदत आणि अन्नछत्रे चालविली. १८९७ मध्ये पुण्यात प्लेगची साथ आली. डॉ.यशवंत फुले यांच्या दवाखान्यातसावित्रीबाई सेवा करत होत्या. अशातच अनेकांना पुरून उरणारी, अनेक संकटांवर मात करणारीसावित्रीबाई मात्र या जीवघेण्या प्लेगच्या साथीत अडकली व प्लेगची बळी ठरली. सावित्रीबाईंच्या कार्य-विचारांचा व्यापक, विशाल, अथांग अर्थ प्राप्त झाला आहे. आधुनिक भारत, आधुनिक समाज आणि आधुनिक समाजाची आधुनिक संस्कृती याचा ध्यास या कार्य विचारातून प्रकट झाला. त्यासाठीचसावित्रीबाईंच्या विचारांची, कार्याची वर्तमानाला गरज आहे, त्यातून उज्ज्वल भविष्य निर्माण होईल. गर्भातच स्त्री संपविणाऱ्या या वर्तमानाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्यासाठीसावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे, विचाराचे स्मरण आणि आचरण अटळ आहे. अशा या माऊलीचा ३ जानेवारी जन्मदिवस शिक्षकदिन म्हणून साजरा व्हावा, अशी मागणी सर्व बहुजन समाजाकडून होत आहे.

**आज जयंतीनिमित्त सावित्रीबाईंना प्रणाम..!!**


**डॉ.कपिल झोटिंग**
९७६७८५४३१५
**समाजसंवाद**